**<u>सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:-</u>**

मी माझे सरतपासाच्या प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१४५ वर दाखल केलेले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला <u>निशाणी क्र.१२८</u> दाखविण्यात आले. मी वादी व प्रतिवादी यांना ओळखतो. यांच्या गावातील सर्व्हे क्र.६३ बाबत वाद मिटावा याकरिता गावकरी माझ्याकडे आले. सदर जमीन गावकीची होती. त्यावेळी मी बैठक घेतली व सामोपचाराने वाद मिटावा म्हणुन मुळ मालक व सातबारा वरील त्यावेळचे गावकरी यांच्यात <u>निशाणी क्र.१२८</u> वरील दस्त करण्यात आला. सदरहू बक्षीसपत्रामधील मजकुर माझ्यासमक्ष ठरलेला होता. माझ्यासमक्ष त्याबाबत चर्चा झाली होती. सदरहू दस्तावर साक्षीदार म्हणुन पान क्र.१० वरील अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील जमीन गुरचरणासाठी देण्याचे ठरले होते.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे ॲड. अमित पाटील:-</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, बल्लाळ वासुदेव जोशी यांनी सदरहू जागा संपुर्ण मोह या गावाला दिली. पुर्वी मालक व गावकऱ्यांमध्ये वाद झाला होता व त्यामध्ये मी व डॉ. दवे यांनी मध्यस्थी केली. वाद संपावा असे मालकांना वाटल्याने सदरहू जमीन गावाच्या हिताकरिता व गावाच्या फायद्याकरिता जमीन देणे हा मालकांचा हेतु बक्षीसपत्र करण्यामागे होता. जमीन देतेवेळी सदरहू जमीन गुरचरण म्हणुन वापरावी व त्याची विक्री करू नये या अटींवर जमीन देण्यात आली. बक्षीसपत्र लिहुन घेणार यांनी गावाच्या वतीने बक्षीसपत्रावर सहया केल्या असुन त्यांनी वैयक्तिकरीत्या सहया केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोक मालकाने ठरवुन

दिल्याप्रमाणे जमिनीचा वापर गुरचरणासाठी करीत होते व आज देखील सदरहू जमिनीचा वापर गुरचरणासाठी केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीचा मालकी हक्क संपुर्ण मोह गावाकडे आलेला आहे. निशाणी क्र.१२८ वरील बक्षीसपत्रावर सर्वांनी सहया केल्यानंतर मी साक्षीदार म्हणुन सही केली. निशाणी क्र.१२८ वरील बक्षीसपत्रामधील मजकुर खरा व बरोबर आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिवादी क्र.१९ यांचेतर्फे घेण्यात येणारा उलटतपास स्वीकृत असल्याचे प्रतिपादन केले.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१९ तर्फे ॲड. एस. के. राणे:-</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८७ मध्ये बल्लाळ जोशी कुटूंबिय आणि गावकरी यांच्यामध्ये शहा आणि गिरीकेंद्रा यांना मिळकत विक्री केल्यानंतर वाद उपस्थित झाला. त्यावेळी सामंजस्याने वहिवाटी ज्यांच्या आहेत त्या काढून टाकण्याचे ठरले. बल्लाळ कुटूंबाला सदर मिळकती ब्रिटीशांनी इनाम म्हणुन दिलेल्या होत्या व त्या त्यांच्या नावे सातबारा सदरी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.१४१ बाबत वाद उपस्थित होऊ नये म्हणुन सर्व्हे क्र.६३/० ही जमीन ग्रामस्थांना देण्यात आली. सन १९८०-८५ मध्ये पनवेल येथे शेती व्यवसाय होता व ग्रामस्थांना गुरे चारण्यास सदरहू जमीन देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू जमीन बल्लाळ कुटूंबियांनी ग्रामस्थांना देतेवेळी सदर जमीन गुरे चरण्यासाठी वापरावयाची असुन विक्री करावयाची नाही ही बाब बक्षीसपत्रामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीन विक्री न

करण्याबाबत लिखीत अट बल्लाळ कुटूंबियांनी बक्षीसपत्रामध्ये घातली नाही. सदर जमीन मिळकतीबाबत वाद उपस्थित झाल्यास ग्रामस्थांनी तो सोडविण्याबाबत बक्षीसपत्रात नमुद केले आहे. तुकाराम पाटील हे दत्तात्रय बाळु पाटील यांचा मुलगा आहे. बक्षीसपत्राचा दस्त झाला त्यावेळी तुकाराम पाटील हे १५ वर्षांचे होते. दत्तात्रय बाळु पाटील हे त्यावेळी गावातील प्रतिष्ठीत पंच होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिष्ठीत पंचांनी घेतलेला निर्णय गावाच्या हिताकरिता असेल अशी प्रचलित प्रथा होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० ते २०२५ मध्ये पनवेल येथे अनेक उद्योगधंदे आल्याने शेती व्यवसाय जवळजवळ संपुष्टात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेती व्यवसाय संपुष्टात आल्याने दत्तात्रय बाळु पाटील यांनी गावाच्या हिताकरिता जमीन विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी साक्ष ही बल्लाळ जोशी व गावकरी यांच्यात झालेल्या बैठकीबाबत आहे.

**प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि.अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.२० तर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.४१ ते ४८ तर्फे**

**प्रतिवादी क्र.४१ ते ४८ यांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिवादी क्र.२१ ते ४० यांचेतर्फे घेतलेला उलटतपास स्वीकृत असल्याचे प्रतिपादन केले.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

पनवेल
दिनांक : १३/०१/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल